RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(११)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ५४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **०४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XLII OF 2025.**

A BILL

TO PROVIDE FOR MATERNITY ASSISTANCE TO WORKING WOMEN AND AGRICULTURAL WORKERS AND FOR CERTAIN OTHER MATTERS CONNECTED THEREWITH.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२.**

**कामकरी स्त्रिया व महिला शेतमजूर यांच्याकरिता प्रसूती सहाय्याची व त्याच्याशी संबंधित अशा इतर बाबींची तरतूद करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** कामकरी स्त्रिया आणि शेतमजूर यांच्याकरिता प्रसूती सहाय्याची तरतूद करणे आणि हे सहाय्य फक्त दोन प्रसूतिपूरतेच मर्यादित करण्यासाठी व त्याच्याशी संबंधित अशा इतर विवक्षित बाबींकरिता तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** याद्वारे, भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास महाराष्ट्र कामकरी स्त्रिया व महिला शेतमजूर (प्रसूती सहाय्य) अधिनियम, २०२५ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव प्रारंभ.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा तारखेस अंमलात येईल.

व्याख्या. **२.** या अधिनियमात संदर्भान्वये अन्यथा आवश्यक नसेल तर-

"कामकरी स्त्रिया" व "महिला शेतमजूर" याचा अर्थ, ज्या कामात अंगमेहनतीच्या कामाचा अंतर्भाव होतो असे काम शेतावर किंवा अन्य कोणत्याही ठिकाणी, रोजंदारीवर करणाऱ्या स्त्रिया असा असून त्यामध्ये रोजगार हमी योजनेखाली करण्यात येत असलेल्या कामांवर लावलेल्या स्त्रियांचाही समावेश होतो.

प्रसूती सहाय्य देणे. **३.** प्रत्येक कामकरी स्त्रीला व महिला शेतमजुराला तिच्या प्रत्येक बाळंतपणाच्या वेळी राज्य शासनाकडून रुपये २०००० एवढी रोख रक्कम, प्रसूती सहाय्य म्हणून देण्यात येईलः

परंतु, हे सहाय्य फक्त दोन प्रसूतिंपुरतेच मर्यादित असेल.

नियम तयार करण्याचा अधिकार. **४.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याकरिता, राज्या शासन **राजपत्रातील** पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, पुढील नियम करील :-

(२) ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करु नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या यथास्थिती अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच नियम अंमलात येईल किंवा येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

शासकीय सेवेत असणाऱ्या महिलांकरिता त्यांच्या सेवाशर्तीचे नियमन करणाऱ्या संबंधित नियमान्वये तीन महिने भर पगारी रजा इ. सारख्या प्रसूती लाभांची तरतूद करण्यात आली आहे. तथापि, महिला शेतमजूर व अंगमेहनतीचे काम करणाऱ्या महिला किंवा रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या महिलांकरिता विशेष प्रसूती लाभांची तरतूद करण्यात आलेली नाही. अशी तरतूद करण्यात आल्यास, गरोदरपणात पोषक आहार घेऊन स्वतःच्या आरोग्याची योग्य ती काळजी घेणे त्यांना शक्य होईल व त्यामुळे त्या जन्म देणार असलेल्या मुलांचे आरोग्य सुधारेल.

शेतमजूर म्हणून किंवा अंगमेहनतीच्या कामावर लावलेल्या सर्व महिलांना, शासकीय सेवेत असणाऱ्या किंवा सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना उपलब्ध होणाऱ्या प्रसूती लाभांच्या धर्तीवर प्रसूती लाभ मिळण्याची तरतूद करणे हा या विधेयकाचा उद्देश आहे. म्हणून अशा महिलांना राज्य शासनांकडून दोन प्रसूतीच्या वेळी रु.२०००० रोख देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

म्हणून हे विधेयक मांडण्यात आले आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २६ मे, २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

## वित्तीय ज्ञापन

खंड ३ अन्वये प्रत्येक पात्र कामकरी स्त्री व महिला शेतमजुराला दोन प्रसूतीसाठी प्रत्येकी २०,०००/- (रुपये वीस हजार फक्त) रुपयांची आर्थिक सहाय्य करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी राज्याच्या एकत्रित निधी मधून कराव्या लागणाऱ्या प्रत्यक्ष आवर्ती खर्चाचा अंदाज या टप्प्यावर देता येणे शक्य नाही.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड १(३).**—या खंडाद्वारे, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा तारखेस अधिनियम अंमलात येईल अशी तरतूद करण्यात आली आहे.

**खंड ४.**—या खंडाद्वारे, राज्य शासनास, या अधिनियमाच्या तरतुदी पार पाडण्याकरिता नियम तयार करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे.

वरील प्रस्ताव सामान्य स्वरुपाचे आहेत.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ०४ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.